आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

**Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages**

March, 2021, Issue-74, Vol-03

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

सेवा करण्यात त्यांनी धन्यता मानली. हे सावित्रीबाईंचे कार्य महत्त्वपूर्ण असेच आहे, असे प्रस्तुत कवी–कवयित्रींना मनस्वी वाटत असल्यामुळे व सावित्रीबाईंच्या धडाडीच्या कार्याची आजही गरज भासत असल्यामुळे त्या प्रेरक ठरतात. हा आशावाद याठिकाणी महत्त्वपूर्ण ठरतो.

### समारोप

मध्ययुगीन काळातील मराठी साहित्यापासूनच मराठी कवितेला एक चांगली परंपरा आहे. मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील जवळजवळ ८०० वर्षाचे काही अपवाद वगळता सर्व लेखन कवितेच्या माध्यमातूनच झालेले आहे. परंतु अलिकडच्या काळात मात्र समाज सुधारकांनी केलेल्या कार्याबद्दल काव्याच्या माध्यमातून लेखन फारसे झालेले दिसत नाही. कविता या लेखनप्रकारातून त्या व्यक्तीच्या जीवनातील अनेक भावबंध, भावतरंग, अंतर्मनातील क्रिया प्रतिक्रिया अधिक तरलतेने समाजमनापर्यंत पोहोचू शकतात. फुले दांपत्याच्या जीवनावर, सावित्रीबाईंच्या जीवन कर्तृत्वाविषयी काही प्रमाणात कविता लेखन झालेले दिसून येते.

सावित्रीबाईंच्याविषयी काळाच्या ओघात कादंबरी, नाटक, एकांकिका इत्यादी ललित साहित्याचे लेखन झालेले आहे. तसेच काही प्रमाणात कविता लेखनही झालेले आहे. सावित्रीबाईंच्याविषयी लिहिल्या गेलेल्या कवितांमध्ये स्त्रीकवयित्रींनी लिहिलेल्या कवितांची संख्याच अधिक आहे. पुरूष कवींनी लिहिलेल्या कविता संख्येने कमी आहेत. ही दरीसुद्धा कमी झाल्याशिवाय समता, समभाव सर्वाच्या मनीमानसी जागलेला आहे असे म्हणता येणार नाही. त्याचबरोबर सावित्रीबाईंच्या विषयी कविता लिहिताना सामाजिकदृष्टया अजूनही प्रगल्भ कविता लिहिली जाणे गरजेचे आहे.

### संदर्भ–

१. लवटे (डॉ.) सुनीलकुमार, पाटील बी.एम., 'काव्यसावित्री', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ३ जानेवारी २००५

२. गायकवाड (डॉ.) दिनकर, 'पौर्णिमा' (सावित्रीबाई फुले विषयक लेखसंग्रह), कल्याणी (संपादक) प्रिंटर्स, नीरा, प्रथमावृत्ती, जून १९९८, पृ. ६६

३. माळी (डॉ.) मा.गो., 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' आशा प्रकाशन, गारगोटी, द्वितीयावृत्ती, ३ एप्रिल १९८९, पृ.११५

**11**

# अमरावती जिल्हयातील वृत्तपत्र वाचकाचे ऑफलाइन वा ऑनलाइन वाचन : एक अभ्यास

**श्री. संगीतराव साहेबराव टाले**
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

**प्रा. अरविंद एस. पाझारे**
ग्रंथपाल,
भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती

**********

**सार (Abstract) :**

यामध्ये अमरावती जिल्हयातील वृत्तपत्र वाचकाचे ऑफलाइन वा ऑनलाइन वाचन : एक अभ्यास या विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये कोणत्या भाषेत वृत्तपत्र वाचन करता. मराठी, हिंदी व इंग्रजी हया भाषा घेण्यात आले. मराठी भाषेत वृत्तपत्र वाचन करणा-या पेपरची नावे घेण्यात आली. हिंदी भाषेत वृत्तपत्र वाचन करणा-या पेपरची नावे घेण्यात आली. इंग्रजी भाषेत वृत्तपत्र वाचन करणाऱ्या पेपरची नावे घेण्यात आली. वृत्तपत्र हे ऑफलाइन, ऑनलाइन व दोन्ही पध्दतीने वाचन करणा-यांचा अभ्यास करण्यात आल. ऑनलाइन वृत्तपत्र वाचन संगणक, लॅपटॉप व मोबाईल याचा वापर करता या बाबत माहिती घेतली. वृत्तपत्र वाचन कोठे करता. वृत्तपत्र वाचण्याकरीता किती वेळ देता. वृत्तपत्रातील कोणती माहिती वाचने आवडते या बाबत माहिती घेतली. वृत्तपत्र वाचण्याचा हेतू काय आहे या बाबत माहिती घेतली. गुगल फॉमद्वारे १५० अभ्यासकांनी प्रतिसाद दिला आहे.

**कळ शब्द (Keywords) :** वृत्तपत्र ऑफलाइन, ऑनलाइन वाचन, मराठी वृत्तपत्र, हिंदी वृत्तपत्र, इंग्रजी वृत्तपत्र.

### प्रस्तावना (Introduction)

वृत्तपत्र हे प्राथमिक साधन आहे. नविन घडामोडीचे अत्यावश्यक साधन वृत्तपत्र होय. वृत्तपत्र वाचनाने जागतिक घडामोडीचे ज्ञान अवगत होत आहे. सर्वसामान्याचे वाचन आणि स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यांचे वाचन यात फरक दिसून येतो. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्याकरीता वृत्तपत्र हा आत्माच असतो. वृत्तपत्र ही

वाचकांच्या जीवनाशी, विचारांशी, कल्पनेशी, ध्येयवादाशी त्यांचा विविध गरजा त्यांच्या समस्या, प्रश्न त्यांच्यावरील अन्याय, त्यांचे सुख दुःख यांच्याशी समरस झालेले असतात. सुरुवातीच्या काळात वृत्तपत्रे मुद्रित स्वरुपात असायची पण आता सोबतीला इलेक्ट्रॉनिक स्वरुपात आणि बहुमाध्यमीय आकर्षक वृत्तपत्रे नजरेस पडतात. कोविड-१९ महामारीच्या काळात इलेक्ट्रॉनिक वृत्तपत्राला महत्व आलेले दिसते. विविध प्रसारमाध्यमे विश्वाच्या कानाकोपऱ्यात घटना वाचकांपर्यंत पोहचविण्याचे काम वृत्तपत्र करीत असतात. 'वृत्तपत्र' या माध्यमातून विश्वाचे अंतरंग उलगडले जाते. दैनंदिन जिवनाचे अविभाज्य अंग म्हणजे वृत्तपत्र लोकशिक्षणाचे प्रभावी व उपयुक्त मानवी जीवनाचे घटक असलेल्या वृत्तपत्रावर अमरावती जिल्हयातील वाचक काय आणि कशाकरीता वाचतात ? कोणत्या वयातील वाचक जास्त वृत्तपत्र वाचन करतात ? वाचनाचा नेमका उद्देश काय ? कोणत्या स्वरुपातील वृत्तपत्र वाचन करतात कोणत्या भाषेतील वृत्तपत्राला महत्व दिल्या जाते. इलेक्ट्रॉनिक वृत्तपत्र वाचनाकरीता कोणते साधन वापरले जाते ?वृत्तपत्रात कोणते मथळे किंवा सदर वाचले जातात अशा एक ना अनेक प्रश्नाची उकलबाबी म्हणून हा अभ्यास प्रश्नावली भरुन आणि त्यांचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करुन उलगडा करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**वृत्तपत्राचे प्रकार :**

वृत्तपत्र हे दैनिक, साप्तहिक, पाक्षिक /अर्धमाही, मासिक, तिमाही, अर्ध वार्षिक, वार्षिक असतात.

**व्याख्या :**

घडलेली घटना व इतर मजकुर वाचकांपर्यंत पोचवणारे (बहुधा ) छापील प्रकाशन म्हणजेच 'वृत्तपत्र' होय.

**उद्दीष्टे :**

१) अमरावती जिल्हयातील ऑफलाइन व ऑनलाइन वृत्तपत्र वाचकांचा कल शोधण्यासाठी.

२) वृत्तपत्र वाचकांच्या भाषेच्या पसंतीची तपासणी करणे.

३) वाचकामध्ये ऑफलाइन व ऑनलाइन वृत्तपत्रामधील वाचणाची सुलभता तपासण्यासाठी .

४) पुरुष व स्त्री वृत्तपत्र वाचकांचा कल तपासणे.

५) वृत्तपत्र ऑनलाइन वाचल्यामुळे होणारे फायदयाचा शोध घेणे.

**संशोधनाची व्याप्ती :**

अमरावती जिल्हयातील वाचकांकडून दिनांक १ डिसेंबर २०२० ते ३१ जानेवारी २०२१ या कालावधी मध्ये गुगल फॉर्मवर प्रश्नावली तयार करुन ऑनलाइन प्रश्नावली उत्तरदात्याकडून भरुन घेतली व माहिती गोळा केली.

**माहिती संकलनाची साधने :**

माहिती संकलन हे संशोधनाकरीता निवडलेल्या "अमरावती जिल्हयातील वृत्तपत्र वाचकाचे ऑफलाइन वा ऑनलाइन वाचन" : एक अभ्यास दिनांक १ डिसेंबर २०२० ते ३१ जानेवारी २०२१ या कालावधी माहिती संकलन केले. माहिती संकलन गुगल फॉर्मवर मध्ये फॉर्म तयार करुन फॉर्म भरुन घेतले व माहिती वेबसाईट व इंटरनेटच्या माध्यमातून जमा करुन तिचा वापर करण्यात आला आहे.


**माहिती :**

अमरावती जिल्हयातील वृत्तपत्र वाचकाचे ऑफलाइन वा ऑनलाइन वाचन : एक अभ्यास या मध्ये बारा मुख्य घटक आहेत. हे सर्व घटक वेगवेगळे करुन त्याचे विश्लेषण केले गेले व त्याचा अन्वार्थ (Interpretation ) त्या खाली नमूद केले आहे

**सारणी क्रमांक-१ वृत्तपत्र वाचन करणा-यांचे शिक्षण विश्लेषण**

| अ.क्र | वृत्तपत्र वाचन करणाऱ्यांचे शिक्षण | वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १० वी | ७ | ४.६६ |
| २ | १२ वी | ४५ | ३० |
| ३ | पदवी | ६८ | ४५.३४ |
| ४ | पदव्युत्तर | ३० | २० |
| | एकूण | १५० | १०० |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की , सर्वात जास्त वृत्तपत्र वाचन करणारे हे पदवी धर आहे ते ६८ (४५.३४%) , त्यांनतर १२ वी शिक्षण घेणारे ४५ (३०%), पदव्युत्तर ३० (२०%) तर सर्वात कमी १० वी शिक्षण घेणारे ७ (४.६६%) अशा प्रकारे वृत्तपत्र वाचन घेणोर आहेत.




**सारणी क्रमांक-२ वृत्तपत्र वाचन करणा-यांचे लिंग निहाय विश्लेषण**

**वृत्तपत्र पुरुष व स्त्री यांचे प्रमाण शोधून काढण्यासाठी लिंग निहाय विश्लेषण करण्यात आले.**


| अ.क्र | लिंग निहाय वृत्तपत्र वाचन करणारे | वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष | ८१ | ५४ |
| २ | स्त्री | ६९ | ४६ |
| | एकूण | १५० | १०० |

हिंदी मध्ये प्रथम "उदन्त मार्तण्ड " हे समाचार वृत्तपत्र प्रकाशित झाले. याचे प्रकाशन ३० मे १८२६ ला झाले. 'दैनिक भास्कर ' हिंदी एक दैनिक समाचार पत्र आहे. याची सुरुवात सन १९५६ मध्ये मध्यप्रदेश भोपाळ येथे झाली. सर्वप्रथम 'दैनिक भास्कर ' सन १९५७ मध्ये भोपाळ 'सुबह सवेरे ' आणि ग्वालियर मध्ये 'गुड मॉर्निंग ' या नवाने प्रकाशित झाला. सन १९५८ मध्ये 'भास्कर समाचार' नावने प्रकाशित झाला. सन २०१० पासून 'दैनिक भास्कर ' या नावाने प्रकाशित होत आहे. 'दैनिक भास्कर ' हे वृत्तपत्र दुस-या क्रमांकावर आहे.

**सारणी क्रमांक-६ हिंदी भाषेत वृत्तपत्र वाचन करणा-यांचे विश्लेषण**

| अ.क्र | हिंदी वृत्तपत्राची नावे | वृत्तपत्र वाचना-यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दैनिक भास्कर | १०३ | ६८.६६ |
| २ | दैनिक जागरण | २७ | १८ |
| ३ | अमर उजाला | १७ | ११.३३ |
| ४ | जनसत्ता | २७ | १८ |
| ५ | हिंदुस्थान | ५४ | ३६ |
| ६ | नवभारत टाइम्स | ३५ | २३.३३ |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की , सर्वात जास्त वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या दैनिक भास्कर १०३(६८.६६%), हिंदुस्थान ५४ (३६%), नवभारत टाइम ३५ (२३.३३%), दैनिक जागरण,जनसत्ता २७ (१८%) तर सर्वात कमी वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या अमर उजाला १७ (११.३३ %) इतकी आहे.




**इंग्रजी वृत्तपत्र :**


भारतातील पहिले इंग्रजी वृत्तपत्र कलकत्ता जनरज ॲडव्हर्टायझर किंव बेंगॉल गॅझेट हे कलकत्ता येथे २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्टस हिकी या ब्रिटिश व्यक्तीने सुरु केले. ते हिकिज बेंगॉल गॅझेट म्हणूनही ओळखले जाते. ०४ नोव्हेंबर १७८० मध्ये बी. मेसिन्क व पीटर रीड यांनी इंडिया गॅझेट ( कलकत्ता ॲडव्हर्टाझर ) हे साप्ताहिक सुरु केले. मद्रासमधील पहिले इंग्रजी वृत्तपत्र मद्रास कुरिअर हे होय. १७८५ साली रिचर्ड जॉन्सन या सरकारी मुद्रकाने सुरु केले. १७९१ मध्ये मद्रास कुरिअरचा संपादक बॉईड याने हुर्कारु हे वृत्तपत्र काढले.

द टाइम्स ऑफ इंडिया हे भारतामधील एक आघाडीचे इंग्रजी वृत्तपत्र आहे. २००८ सालामधील एका सर्वेक्षणानुसार रोजचा ३१.४ लाख खप असलेले द टाइम्स ऑफ इंडिया हे जगातील लोकप्रिय इंग्लिश तर सर्व भाषीय वृत्तपत्रांमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे वृत्तपत्र आहे. ३ नोव्हेंबर १८३८ रोजी द बॉम्बे टाइम्स अँड जनरल ऑफ कॉमर्स या नावने झाली.

**सारणी क्रमांक-७ इंग्रजी भाषेत वृत्तपत्र वाचन करणाज्यांचे विश्लेषण**

| अ.क्र | इंग्रजी वृत्तपत्राची नावे | वृत्तपत्र वाचना-यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | The times of India | ११३ | ७५.३३ |
| २ | The Hindu | ३४ | २९.३३ |
| ३ | Hindustan times | ३५ | २३.३३ |
| ४ | The Indian express | ४७ | ३१.३३ |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की , सर्वात जास्त वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या The times of India ११३(७५.३३%), The Indian express ४७ (३१.३३%), Hindustan times ३५ (२३.३३%) तर सर्वात कमी वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या The Hindu ३४ (२९.३३ %) इतकी आहे.





**सारणी क्रमांक-८ वृत्तपत्र वाचन ऑनलाइन,ऑफलाइन व दोन्ही पध्दतीने करणा-यांचे विश्लेषण**

| अ.क्र | वृत्तपत्र वाचन पध्दती | वृत्तपत्र वाचना-यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाइन | ३३ | २२ |
| २ | ऑफलाइन | २४ | १६ |
| ३ | वरील दोन्ही पध्दती वाचन | ९३ | ६२ |
| | एकूण | १५० | १०० |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की , सर्वात जास्त वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या वरील दोन्ही पध्दतीने म्हणजे ९३ (६२%),ऑनलाइन ३३ (२२%) तर सर्वात कमी वृत्तपत्र वाचणा-यांची संख्या ऑफलाइन २४ (१६ %) इतकी आहे.

वरील सारणीवरुन असे दिसून येते की , वृत्तपत्र माहिती आवडते ती पुढील प्रमाणे सर्वात जास्त स्वतःचे सामान्य ज्ञान वाढविण्याकरीता ११३(७५.३३%), शिक्षण १११ (७४%), माहिती मिळविण्याकरीता १०१ (६७.३३%), विज्ञान तंत्रज्ञान ९५(६३.३३%),मनोरंजन ७०(४६.६६%), क्रिडा ६५(४३.३३%), स्वतःची आवड आहे म्हणून ५९(३९.३३ %), राजकारण ५२ (३४.६६%), संपादकीय ४४ (२९.३३%), राज्ये ४३ (२८.६६%) तर सर्वात कमी वेळ घालविण्याकरीता (Time Pass) ६ (४%) आहे.




**निष्कर्ष :**

१) विभागवार विश्लेषण केले असता सर्वात जास्त वृत्तपत्र वाचना-यांची संख्या ही पदवीधराची आहे.

२) पुरुष व स्त्री विशिष्ट भाषेत वृत्तपत्र वाचण्यात किरकोळ फरक दर्शविते.

३) वयोगटामध्ये २०-३० या वयोगटातील वृत्तपत्र वाचना-यांची संख्या जास्त आहे.

४) बहुतेक वाचकांमध्ये मराठी वृत्तपत्र हे सर्वाधिक वाचक असल्याचे आढळते त्यानंतर इंग्रजी भाषा आणि हिंदी भाषा आहे.

५) मराठी भाषेमध्ये लोकमत , हिंदी भाषेमध्ये दैनिक भास्कर , इंग्रजी भाषेमध्ये The times of India हे वृत्तपत्र सर्वात जास्त वाचतात.

६) वृत्तपत्र हे सर्वात जास्त दोन्ही पध्दतीत वाचतात नंतर ऑनलाइन , ऑफलाइन वाचतात.

७) ऑनलाइन वृत्तपत्र हे मोबाईलवर जास्त वाचतात.

८) वृत्तपत्र हे घरी सर्वात जास्त वाचतात. वृत्तपत्र वाचन हा एक दैनंदिन उपक्रम आहे जो केवळ घरापूरता मर्यादित नाही . सार्वजनिक ग्रंथालय, महाविद्यालय ग्रंथालय, कार्यालय, इतर ठिकाणी वृत्तपत्र वाचण्याचे मार्ग सापडतो.

९) वृत्तपत्र हे सर्वात जास्त वेळ २० मिनीट वाचतात.

१०) वृत्तपत्र हे स्वतःचे सामान्य ज्ञान वाढविण्याकरीता जास्त वाचतात.

११) इंटरनेटवर वृत्तपत्र असल्यामुळे ऑनलाइन वाचन्याचे प्रमाण वाढले आहे.

१२) आज स्मार्ट मोबाईल असल्यामुळे वृत्तपत्र हे ऑनलाइन मोबाईलवर कोठेही वाचता येते.

**संदर्भ सूची :**


१) कर्वे, स्वाती . 'सकाळ' वृत्तपत्र आणि वृत्तपत्रसमूह, राज्य मराठी विकास संस्था, (२००१) पृ.५७-७३

२) खिंवसरा मंगल. स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग, स्वरुप प्रकाशन पृ.१४१

३) पवार, सुधाकर. पत्रकारितेची मुलतत्वे, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन २ री आ.२००६ पृ.क्र. ११४

४) मेश्राम, संगीता., राजकीय प्रबोधन मराठी वृत्तपत्रे , नागपूर, विद्या बुक्स २००८.

५) लेले, रामचंद्र केशव. मराठी वृत्तपत्राचा इतिहास , खंड १ ला (१७८० ते १८०० ) मुंबई १९५१

६) लेले, रा.के. मराठी वृत्तपत्राचा इतिहास, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन २ री आ.२००४.

७) Internet in India-२०१६ An IAMAI & KANTAR IMRB Report

८) onlinenews. lokmat.com/php/ detailednews.php?id= MainEdition-१-१-२८-५-२००९-३४b५f&hdate=२००९-०५-२८ & editionname = main ७Oct.२००९

९) Sharma Chetan & Saini Rajni, Newspaper Reading Habit among the students of University college kurukshetra : A case study. http:// www.reseachgare.net accessed on २२-०१-२०२१

१०) Sivakumar Nand Tamilsevan N., News paper according habits of college student : A case study of kalaignog karunanidhi Institute of Technology www.tiprc ort.pdf accessed on २२-०१-२०२०

११) Tiwari Pradeep, The Habits of Online Newspaper Readers in India, Journal of Socialomics ४:२ (२०१५) p.१-५

१२) Vishwakosh Marathi gov.in accesed on २२-०१-२०२१

१३) www.tmv.edu.in pdf accesed on २२-०१-२०२१